आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

२६ डिसेंबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते यंदाचे प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान /मुंबईची केया हटकर आणि अमरावतीच्या करिना थापाचा गौरव
- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते सुपोषित ग्राम योजनेचा प्रारंभ
- बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या चौथ्या सामन्यात दिवसअखेर ऑस्ट्रेलियाच्या  ६ बाद ३११ धावा

**आणि**

- येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी, तर कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पड्ण्याची शक्यता

**<><><><><>**

प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचं आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते नवी दिल्लीत समारंभपूर्वक वितरण करण्यात आलं. कला तसंच संस्कृती, धाडस, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, सामाजिक सेवा, क्रीडा आणि पर्यावरण अशा विविध सात श्रेणींमध्ये १७ बालकांना असाधारण कामगिरीसाठी हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात मुंबईची १३ वर्षीय केया हटकर आणि अमरावतीच्या १७ वर्षीय करिना थापा हिचा समावेश आहे.  केया हटकर, डान्सिंग ऑन माय व्हील्स आणि आय एम पॉसिबल या दोन बेस्टसेलर पुस्तकांची लेखिका आहे. तिला कला आणि संस्कृती क्षेत्रातील कामगिरीसाठी पुरस्कृत करण्यात आलं. करिना थापाला तिच्या धाडसाबद्दल राष्ट्रीय बाल पुरस्कारानं गौरवण्यात आलं. तिनं अतुलनीय प्रसंगावधान दाखवत  आगीतून गॅस सिलेंडर बाहेर काढून तब्बल ३६ जणांचे

प्राण वाचवले होते. या बालकांचे साहस अद्वितीय असून भारतीयांसाठी प्रेरणादायी असल्याचं राष्ट्रपती याप्रसंगी म्हणाल्या....

शीख धर्मियांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंह यांचे दोन पुत्र, बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंह यांच्या बलिदानाचं स्मरण करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

**<><><><><>**

अमरावतीच्या करीना थापाला आज राष्ट्रपतींच्या हस्ते प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार प्रदान करण्यात आला. अमरावतीमधल्या जय अंबा इमारतीमध्ये सिलेंडरमुळे लागलेल्या आगीतून अनेकांना वाचवणारी करिना त्या दिवशीच्या घटनेबाबत म्हणाली....

तिच्या साहसाबद्दल अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांनी सांगितलं...

**<><><><><>**

वीर बालदिवस हा देशातल्या नागरिकांसाठी राष्ट्रीय प्रेरणा दिवस असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित वीर बाल दिवस कार्यक्रमात ते बोलत होते. देशापुढं इतर काहीही महत्त्वाचं नाही हीच साहेबजाद्यांच्या बलिदानाची शिकवण असल्याचं ते म्हणाले**...**

सुपोषित ग्राम पंचायत योजनेचा प्रारंभ प्रधानमंत्र्यांनी यावेळी केला. पोषण आहाराशी संबंधित सेवा सुविधा  सामाजिक योगदानातून ग्रामपंचायत पातळीवर उपलब्ध करुन देणं हे या अभियानाचं उद्दिष्ट आहे.

वीर बालपुरस्कार विजेत्या मुलांशी या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी संवाद साधला. तसंच नंतर झालेल्या संचलनाला हिरवा झेंडा दाखवला. आणि मानवंदना स्वीकारली. विविध राज्यांच्या पारंपरिक समृद्धीचं दर्शन घडवणारी वेशभूषा केलेल्या मुलांची पथकं आणि चित्ररथ या संचलनात सहभागी झाले होते. देशभरातून सुमारे तीन हजाराहून अधिक मुलं या सोहळ्यात सहभागी झाली होती.

**सांगली** शिक्षण संस्थेच्या पथकानं महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करत लेझीम कलाप्रकाराचं प्रात्याक्षिक सादर केलं. संस्थेतल्या १८ विद्यार्थिनी सह ४ वादक, १ व्यवस्थापक आणि १ संघ प्रमुख अशा २४ जणांच्या संघाने हे प्रात्यक्षिक यशस्वी केलं.

<><><><><>

जम्मू काश्मीरमध्ये पूंछ इथं मंगळवारी झालेल्या एका अपघातात शहीद झालेल्या जवानांना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे. या अपघातात शहीद झालेल्या महाराष्ट्रातल्या दोन जवानांच्या कुटुंबांना राज्य सरकारच्या वतीनं १ कोटी रुपये आर्थिक मदत आणि इतर लाभ देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

मराठा रेजिमेंटचे नायक शुभम समाधान घाडगे हे सातारा जिल्ह्यातल्या कामेरी इथले तर, सिपॉय अक्षय दिगंबर निकुरे हे चंद्रपूर जिल्ह्यातल्या पिंपळगाव इथले रहिवासी आहेत.

<><><><><>

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त अकोल्यात राज्यशासनाचा कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेच्या संयुक्त विद्यमाने उद्यापासून येत्या २९ डिसेंबरपर्यंत राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. प्रदर्शनाचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या बॉर्डर गावसकर कसोटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज मेलबर्न इथं सुरू झाला. यजमान ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाकडून सॅम कोन्टास, उस्मान ख्वाजा आणि मार्क्स लाबुशेन यांनी अर्धशतकी खेळी केली. पाच सामन्यांच्या मालिकेत दोन्ही संघांनी प्रत्येक एकेक सामना जिंकला आहे.

आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ६ बाद ३११ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

अमरावती विभागीय क्रीडा स्पर्धांचं आज यवतमाळ जिल्ह्यातल्या राळेगाव इथं उद्घाटन झालं. या स्पर्धेत विभागातल्या सात प्रकल्पातल्या २  हजार ३०५  विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. क्रीडा स्पर्धांमध्ये व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, भालाफेक, गोळा फेक, हँडबॉल, शंभर मीटर, २००  मीटर, चारशे, आठशे, बाराशे आणि पंधराशे मीटर धावण्याच्या शर्यतींसह इतर व्यक्तीगत आणि सांघिक क्रीडाप्रकारांचा समावेश आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या २७ डिसेंबरला स्वामित्व योजनेचा प्रारंभ होत आहे. देशातल्या सर्व जिल्ह्यांत डिजिटल पद्धतीनं जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ऑनलाईन माध्यमातून हा कार्यक्रम होईल. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपूर इथं ही माहिती दिली. पन्नास लाखांहून अधिक मालमत्ता कार्डांचं वितरण या कार्यक्रमात केलं जाणार आहे.

**<><><><><>**

सीमासुरक्षा दलात ३० वर्ष सेवा पूर्ण करणाऱ्या अधिकारी – कर्मचाऱ्यांना एमएसीपी म्हणजे सुधारित आश्वासित पदोन्नती योजनेचा लाभ देण्याचे आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिले आहेत. निवृत्तीवेतनाच्या निश्चितीसाठी एमएसीपी अंतर्गत तिसऱ्या वित्तीय प्रोन्नतीची मागणी फेटाळली गेल्याविरोधात  सीमा सुरक्षा दलातून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी दाखल

केलेल्या याचिकेवर न्यायालयाने हा आदेश दिला. वयाची ६० वर्ष पूर्ण करण्यापूर्वी आपल्या केडरमधे ३० वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्यांना हा लाभ दिला जावा, अशी मागणी याचिकेत केली आहे. मूळवेतन आणि निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याची मागणीदेखील याचिकाकर्त्यांनी केली आहे. सेनादलांच्या विविध शाखांमधे निवृत्तीचं वय वेगवेगळं ठेवण्याची तरतूद असंवैधानिक असल्याचा निवाडा दिल्ली उच्च न्यायालयानं २०१९मधे दिला होता.

**<><><><><>**

एप्रिल ते आक्टोबर २०२४ च्या कालावधीत निर्यात क्षेत्रात अमरावती विभागात बुलढाणा जिल्हा अव्वल ठरला आहे यंदाच्या या काळात बुलढाणा जिल्ह्यात ४६५ कोटी पेक्षा जास्त रुपयांच्या उत्पादनाची निर्यात झाली आहे.

जिल्ह्यातून सेंद्रिय रसायने रासायनिक उत्पादने साबण अभियांत्रिक उत्पादने तृणधान्य, दागिने,सोयाबीन, संबंधित उत्पन्न बियाणे भाज्या,आणि कापूस, आणि गाठींची निर्यात होते

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या विक्रमगड तालुक्या मधल्या खोमारपाडा या गावात रोजगार हमी योजेअंतर्गत मोठ्या प्रमाणात झालेल्या कामांची आज रोजगार हमी योजना तसचं फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी पाहणी केली. पालघर जिल्ह्यातलं आदिवासी नागरिकांचं खोमारपाडा हे गाव आता आदर्श गाव ठरलं आहे असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात उल्लेखनीय वाढ झाली आहे. कोकणात अनेक ठिकाणी किंचित वाढ झाली आहे.

येत्या दोन दिवसात,  मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी, तर कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पड्ण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**